दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर  वर्ष ४ थे  अंक ५६ वा मंगळवार दि.३० जूलै २०२४ पृष्ठे ४  स्वागत मूल्य २ रू.







# देश टॅक्स दहशतवादाच्या चक्रव्यूहात!

नवी दिल्ली : संसदेच्या अधिवेशनात लोकसभेतील विरोधी पक्षनेते काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी शेतकरी, पेपर लीक, देशातील दहशतीचे सावट, बजेट आणि टॅक्सबाबत विविध मुद्यांवर मोदी सरकारला घेरले असून देश टॅक्स दहशतवादाच्या चक्रव्यूहात अडकला आहे. भाजपामध्येही लोक घाबरलेले आहेत. मंत्री घाबरलेत, देशातील शेतकरी भीतीच्या सावटाखाली आहे असे सांगत राहुल गांधी यांनी महाभारतातील चक्रव्यूहाचा उल्लेख करत पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला.

२१ व्या शतकात नवे चक्रव्यूह असून तेही कमळाच्या आकाराचे आहे. ज्या चक्रव्यूहात अभिमन्यूला अडकवले होते. तिथे आता जनता आहे. देशातील युवा, शेतकरी, माता-भगिनी, लघु-मध्यम उद्योजक अडकले आहेत. या चक्रव्यूहचे चिन्ह पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्या छातीवर लावून फिरतात. महाभारतातील चक्रव्यूहात ६ जण होते, द्रोणाचार्य, कर्ण, कृपाचार्य, क्रूतवर्मा, अश्वधामा आणि शकुनी नियंत्रित करत होते. आजही ६ लोक आहेत ज्यात नरेंद्र मोदी, अमित शाह, मोहन भागवत, अजित डोवाल आणि अंबानी-अदानी आहेत असा आरोप राहुल गांधींनी केला. बजेटवरील भाषणात राहुल गांधी यांनी निर्मला सीतारामन यांच्यावर प्रश्न विचारत त्यांच्या बजेटमध्ये पेपर लीकवर एकही शब्द नव्हता. शिक्षण क्षेत्रासाठी यावेळच्या बजेटमध्ये सर्वाधिक कमी निधी देण्यात आला. २० वर्षात पहिल्यांदा इतका कमी निधी शिक्षण खात्याला दिला. टॅक्स टेररिज्म रोखण्यासाठी बजेटमध्ये सरकारने काहीच केले नाही. मध्यमवर्गीयांच्या पाठीत आणि छातीत खंजीर खुपसण्याचे काम



सरकारने केले. याच मध्यमवर्गीयांनी पंतप्रधान मोदींच्या सांगण्यावरून कोविड काळात थाळ्या वाजवल्या, मोबाईल फ्लॅश लाईट लावली. आता हे मध्यमवर्गीय काँग्रेसकडे येतायेत. आम्ही तुमचा चक्रव्यूह तोडणार असा घणाघात राहुल गांधी यांनी केला.अग्निवीरांसाठी एक रुपयाही नाही बजेटमध्ये सरकारने अग्निवीर योजनेसाठी एक रुपयाही दिला नाही. त्यांच्या पेन्शनसाठी पैसे नाहीत. अग्निवीर चक्रव्यूहात अडकला आहे. बजेटमध्ये इंटर्नशिप प्रोग्रॅम खेळ बनला आहे. युवकांना रोजगार नाही. रोजगार देणा-यांवर चक्रव्यूह हल्ला करते असा आरोप राहुल गांधींनी केला.

## माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या उपस्थितीत अहमदपूर येथील वंचित बहुजन विकास आघाडी पदाधिकाऱ्यांचा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश



लातूर / प्रतिनिधी :- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत अहमदपूर येथील वंचित बहुजन विकास आघाडी तालुकाध्यक्ष जिलानी मणीयार, जिल्हा उपाध्यक्ष कमलाकर गायकवाड, माजी नगरसेवक सय्यद आयुब, इरफान पठाण आदी पदाधिकाऱ्यांनी सोमवार दि. २९ जुलै रोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. आमदार देशमुख यांनी त्यांचे काँग्रेस पक्षात स्वागत करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक एन.आर.पाटील, लातूर जिल्हा परिषदेचे माजी सभापती चंद्रकांत मद्दे, लातूर जिल्हा अल्पसंख्यांक काँग्रेसचे अध्यक्ष सिराजुद्दीन जहागीरदार, लातूर जिल्हा काँग्रेस सोशल मीडियाचे अध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी, प्रकाश ससाने, श्रीकांत बनसोडे आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

## टवेन्टिवन ग्रीच्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या हस्ते विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने महिलांना स्वावलंबी बनवीणाऱ्या प्रशिक्षण केंद्राच उद्घाटन

लातूर / प्रतिनिधी :- विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. लातुर तालुक्यातील हणमंतवाडी येथे फाउंडेशनच्या वतीने महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या उपक्रमा अंतर्गत महिलांसाठी मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन टवेन्टिवन ग्रीच्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी कमी असल्याने अनेक महिलांना आर्थिक स्वावलंबन साधणे उपलब्ध होत नाहीत. या पार्श्वभूमीवर विलासराव देशमुख फाउंडेशन महिलांना मोफत प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याच्या दिशेने प्रयत्नशील आहे. या प्रशिक्षण केंद्रातून महिलांना शिलाईचे विविध प्रकार शिकवले जाणार असून, प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्या स्वतःचे




उद्योग सुरू करू शकतील. या प्रशिक्षण केंद्रात एकूण ६३ महिलांनी आपला सहभाग नोंदवला आहे. हे प्रशिक्षण पुढील तीन महिन्यांच्या कालावधीत चालणार आहे. या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील आणि आपल्या कुटुंबाचे उत्पन्न वाढवू शकतील, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. या समारंभाला विलासराव देशमुख फाउंडेशनच्या समन्वयक संगीता मोळवणे, जिल्हा परिषद सदस्य सोनाली थोरमोटे, प्रशिक्षक क्रांती उफाडे, अच्युत माने, लक्ष्मण सपाटे, जयराम लोंढे, शेषेराव ढोक, प्रदीप लोंढे, बाळासाहेब लोंढे, नानासाहेब लोंढे, संस्थेचे सोशल प्लॅनर गजानन बोयणे, गावातील महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

# आ. धिरज देशमुख यांच्या प्रयत्नातून जवळगा बॅरेजची उभारणी, लोकनेते विलासराव देशमुख यांची स्वप्नपूर्ती

लातूर / प्रतिनिधी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे आमदार श्री धिरज विलासरावजी देशमुख यांच्या प्रयत्नांमुळे उभारण्यात आलेल्या जवळगा बॅरेज येथे जलपूजन करण्यात आले. राज्यांचे माजी मुख्यमंत्री लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांनी आपल्या दूरदृष्टीने लातूर जिल्ह्यात बराजची निर्मीती करून नागरीकांच्या जिवनात आर्थिक परिवर्तन घडवून आणले. त्याच श्रूखलेतील जवळगा हे बराज मंजूर असून देखील याचे काम काही कारणाने मागील दहा वर्षांपासून होत नव्हते. आमदार झाल्यानंतर या कामास प्राधान्य देवून दीड वर्ष सतत पाठपुरावा करून यासाठीचा निधी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी शासनाकडून मंजूर केला व स्वप्नपूर्तीचा क्षण सर्वांनी याची देहा, याची डोळा अनुभवला. या जलपूजन प्रसंगी आमदार श्री धिरज विलासरावजी देशमुख यांनी शेतकऱ्यांना जलपूजनाचा मान देत त्यांच्या प्रति कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. शिवाय, शेतकरी बांधवांना समृध्दी, संपन्नता लाभू दे असे साकडेही घातले.



राज्याचे माजी मुख्यमंत्री, लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या दूरदृष्टीमुळे लातूर जिल्ह्यातील मांजरा, तेरणा आणि रेणा आदी नद्यांवर बॅरेजची शृंखला तयार झाली आहे. रेणा नदीवरील चारपैकी एका जवळगा को. प. बॅरेजच्या नुतनीकरणाचे काम राहिले होते. श्री. धिरज विलासरावजी देशमुख हे आमदार झाल्यानंतर त्यांनी प्राधान्याने



हे काम पूर्ण करून घेतले. त्यालाच आज जवळगा बॅरेज म्हणून ओळखले जाते. या विकासकामामुळे परिसरातील ३४३ हेक्टर सिंचन क्षमता पुर्नस्थापित होणार आहे. लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांची स्वप्नपूर्ती आमदार धिरज विलासरावजी देशमुख यांनी आपल्या कार्यातून करून दाखवली, आमदार पदाच्या आपल्या कार्यकाळात जनतेच्या हिताला प्राधान्य देत असताना पाण्यासारखा महत्वाचा विषय हाती घेऊन तो सोडवण्यासाठीचा यशस्वी प्रयत्न आपणास करता येत असल्याचे समाधान आ. धिरज विलासराव देशमुख यांनी व्यक्त केले.

यावेळी सर्जेराव मोरे, प्रमोद जाधव, अनंतराव देशमुख, उमाकांत खलंग्रे, उपविभागीय अभियंता मयूर पाटील, शाखा अभियंता सोमेश्वर होळकर, सेवानिवृत्त उपअभियंता दत्तात्रय मामडगी, उपअभियंता सुरेंद्र चव्हाण, शेषराव हाके पाटील, पंडितराव माने, शंकरराव मोरगे, सुशीलकुमार पाटील,सरपंच सौ. संगिता बनसोडे,आदीसह जवळगा, सेलू, हरवाडी व रेणापूर येथील शेतकरी, काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

## आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून मुरढव येथील आगग्रस्त जाधव कुटुंबीयांस सर्व प्रकारच्या साहित्याची मदत

लातूर / प्रतिनिधी : - रेणापूर तालुक्यातील मौजे मुरढव येथील नानासाहेब रावसाहेब जाधव यांच्या घराला अचानकपणे आग लागून घरातील सर्व साहित्य जळून खाक झाल्याने उघड्यावर आलेल्या या कुटुंबास भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी संसार उपयोगी सर्व प्रकारची भांडी, अन्नधान्य, किराणा साहित्य, कपडे, दैनंदिन वापरातील वस्तू देऊन आधार दिला आहे.

२७ जुलै शनिवार रोजीच्या रात्री मुरढव येथील नानासाहेब रावसाहेब जाधव यांच्या घराला अचानकपणे आग लागून सर्व घर जळून खाक झाले. या आगीने रौद्र रूप धारण केल्याने आगीत सर्व साहित्य, अन्नधान्य, कपडे, दैनंदिन वापरातील वस्तू, सोने, रोख रक्कम, शेती औजारासह घरातील संसार उपयोगी वस्तू जळुन खाक झाल्या. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण जाधव कुटुंब उघड्यावर आले आहे.

सदर घटनेची माहिती मूरढव येथील सरपंच लक्ष्मण यादव यांनी संकटात, अडचणीत सापडलेल्याना मानवतेच्या भावनेतून वेळोवेळी मदत करणारे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांना दिली असता क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी सदर कुटुंबांला तातडीने मदत करू असा शब्द दिला.




लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात सोमवारी दुपारी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी आगग्रस्त जाधव कुटुंबांतील नानासाहेब जाधव, पत्नी आशाबाई जाधव, मुलगा व्यंकटेश जाधव आणि शुभम जाधव या सर्वांना दैनंदिन वापराचे कपडे, संसार उपयोगी सर्व प्रकारची भांडी, अन्नधान्य, किराणा साहित्य, अंथरूण पांघरून, दैनंदिन वापरातील वस्तू देऊन आधार दिला आहे. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, रेणापुर तालुका अध्यक्ष अँड दशरथ सरवदे, सांगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, मुरढडचे सरपंच लक्ष्मण यादव, उपसरपंच आकाशदीप चव्हाण, जयप्रकाश जटाळ, बालासाहेब खरोळे, संतोष दाणे, शरद दाणे, विजयकुमार मोटेगावकर, आनंद यादव, राजेश चव्हाण, बाळू महांडूळे, ज्ञानेश्वर येलाले यांच्यासह अनेक जण होते.

## माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांची धाराशिव जिल्हा काँग्रेस शिष्टमंडळाने घेतली भेट

लातूर / प्रतिनिधी : - राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची सोमवार दि. २९ जुलै रोजी सकाळी लातूर शहरातील जनसंपर्क कार्यालयात धाराशिव जिल्हा काँग्रेस अध्यक्ष श्री. धिरज पाटील यांच्या समवेत आलेल्या शिष्टमंडळाची भेट घेऊन, या शिष्टमंडळासोबत आगामी विधानसभा निवडणुकीसह विविध विषयावर चर्चा केली. यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते तुळजापूर तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल रामचंद्र आलूरे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. याप्रसंगी धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष धिरज पाटील, बालाजी घुगे, बालाजी बंडगर, उमेश तांबे, संतोष वडणे, जुबेर शेख, प्रदीप साळुंके, प्रकाश गाटे, रामहरी लोंढे, चंद्रकांत काटे, तानाजी हजारे, संजय कदम, दत्ता डांगे, संजय देशमुख, गणेश शिंदे आदिसह धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते



## संपादकीय....

# पहिल्या आठवड्यात विरोधकांचा वरचष्मा

संसदेचे पावसाळी अधिवेशन २२ जुलै रोजी सुरू झाले आणि २३ जुलै रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केंद्र सरकारच्या तिसर्या कार्यकाळातील पहिला अर्थसंकल्प सादर केला. संसदेचे हे अधिवेशन गेल्या दहा वर्षांच्या तुलनेत पूर्णपणे वेगळे होते. गेल्या १० वर्षांत सत्ताधार्यांसमोर विरोधक कमकुवत होते; मात्र यावेळी सभागृहातील विरोधकांच्या वृत्ती आणि कार्यशैलीमुळे सरकारची रणनीती प्रत्येक टप्प्यावर अयशस्वी ठरली. विरोधकांची आक्रमक वृत्ती पाहून सत्ताधारी पक्षातील घटक पक्ष गप्प बसल्याचे अनेक प्रसंग आले. विरोधी पक्षनेते राहुल गांधी, अखिलेश यादव यांनीही सरकारवर हल्लाबोल केला. संसदेत अधिवेशनात प्रश्नोत्तराचा तास, शून्य प्रहर आणि अर्थसंकल्पावर चर्चा झाली. यात विरोधकांचा वरचष्मा होता. महागाई, अग्निवीर, नीट, बेरोजगारी, शेती अशा अनेक प्रमुख मुद्द्यांवरून लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांत सरकारला कोंडीत पकडण्यात विरोधकांना यश आले. विरोधकांकडून राज्यसभेत काँग्रेसचे जयराम रमेश, रणदीप सुरजेवाला, आम आदमी पक्षाचे संजय सिंह आणि राघव चड्ढा, सपाचे रामजी लाल सुमन आणि तृणमूल काँग्रेसचे साकेत गोखले आणि इतर खासदारांनी सरकारवर हल्लाबोल केला. विरोधकांची एकजूट सत्ताधारी पक्षाला डोकेदुखी ठरत आहे. त्याचवेळी सरकारच्या मित्रपक्षांनी विरोधकांप्रमाणे आक्रमकता दाखवण्यात कमी रस दाखवला. सरकारकडून कोणत्याही विरोधी पक्षावर हल्ला होत असताना इंडिया आघाडीतील पक्षांनी एकजूट दाखवत पलटवार केला. सरकारला अनेक मुद्द्यांवर राजकीयदृष्ट्या बॅकफूटवर नेण्यात काँग्रेसला यश आले आहे. शेतकर्यांच्या प्रश्नांवरून विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारवर असाच राजकीय हल्लाबोल केला. राहुल गांधी यांनी शेतकर्यांच्या शिष्टमंडळाला संसदेत भेटायला बोलावले. राहुल गांधी हवे असते तर ते या शिष्टमंडळाला घरीही भेटू शकले असते; मात्र या भेटीचा राजकीय फायदा घेण्यासाठी राहुल गांधी यांनी शिष्टमंडळाला संसद भवनातील आपल्या कार्यालयात बोलावले. विरोधी पक्षनेत्याच्या या रणनीतीमुळे सरकारमधील अस्वस्थता वाढली. या शिष्टमंडळाला भेटू नये म्हणून संसद पास प्रक्रियेत कडकपणा दाखवण्यात आला. राहुल गांधींनाही तेच हवे होते. त्यांनी सरकारवर शिष्टमंडळाला संसदेत प्रवेश करण्यापासून रोखल्याचा आरोप केला. राहुल गांधींनी हा मुद्दा इतका वाढवला की, सरकारला मागे हटावे लागले. त्यानंतर शेतकरी नेत्यांच्या शिष्टमंडळाला संसदेत जाऊन राहुल गांधींना भेटण्यासाठी पास देण्यात आला. बैठकीनंतर राहुल गांधींनीही शेतकरी हित या भेटीचे भांडवल करण्याचा प्रयत्न केला. तसेच शिष्टमंडळाच्या मागण्यांसाठी शासनावर दबाव टाकण्याचे आश्वासन देऊन त्यांनी शेतकर्यांना संदेश दिला. यानंतर राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान किमान आधारभूत किमतीबाबत विचारलेल्या प्रश्नांवर विरोधकांनी सरकारला कोंडीत पकडले. या मुद्द्यावरून विरोधकांनी एकजूट दाखवत सरकार शेतकरीविरोधी असल्याचा आरोप केला. या अधिवेशनात विरोधकांनी सत्ताधार्यांच्या चुकांचे भांडवल केले. अर्थसंकल्पात आंध्र प्रदेश आणि बिहारला अधिक महत्त्व देण्यात आले. उर्वरित राज्यांबाबत केंद्र सरकारच्या उदासीन वृत्तीने विरोधकांना हल्लाबोल करण्याची संधी दिली. या संधीचा विरोधकांनी पुरेपूर फायदा घेतला. अर्थसंकल्पावरून विरोधकांनी सरकारला धारेवर धरले. दबक्या आवाजात सत्ताधारी पक्षाच्या मित्रपक्षांनीही विरोधकांना साथ दिली. यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. महाराष्ट्राचे शिवसेनेचे शिंदे गटाचे खासदार अर्थसंकल्पावेळी वही-पेन घेऊन बसले होते, जेणेकरून महाराष्ट्रासाठी केलेल्या घोषणांची नोंद घेता येईल; मात्र अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या तोंडून अर्थसंकल्पात महाराष्ट्राचे नाव एकदाही आले नाही. यानंतर शिवसेनेच्या शिंदे गटाच्या खासदारांना वही आणि पेन बंद करून ठेवण्यास भाग पाडले. अर्थसंकल्प संपल्यानंतर महाराष्ट्रासाठी प्रश्नांची उत्तरे द्यावी लागू नयेत म्हणून या खासदारांनी माध्यमांपासून अंतर ठेवले. सरकारला कोंडीत पकडण्याबरोबरच विधानसभा निवडणुकीवर डोळा ठेवून संसदेतून राजकीय संदेश देण्याची खेळीही विरोधकांनी खेळली. त्यासाठी अर्थसंकल्पीय भाषणात कुमारी शैलजा आणि प्रणिती शिंदे यांच्यासह काँग्रेसने पक्षात नवी पिढी निर्माण करण्यासाठी आणि महिला, तरुण आणि दलित व्होट बँकेला टॅप करण्यासाठी खेळी केली. सरकारला या खेळीवर प्रतिक्रिया देण्याचा कोणताही मार्ग सापडला नाही किंवा उलट सरकारला याचा विचारही करता आला नाही. येथेही विरोधकांचा विजय झाला. भाजप खासदार अभिजित गंगोपाध्याय यांच्या वक्तव्यावर संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनाही सभागृहात खेद व्यक्त करावा लागला. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनाही संसदेच्या अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात अनेक वेळा विरोधकांच्या कठोर टीकेला सामोरे जावे लागले. ओम बिर्लासुद्धा या व्यंगांकडे हसून दुर्लक्ष करण्यापलीकडे काही करू शकत नव्हते. पावसाळी अधिवेशनाचा दुसरा आणि तिसरा आठवडा अजून बाकी आहे.

# अनियंत्रित विकासामुळे 'महापूर'

नागपूरसह विदर्भ अलीकडच्या काही वर्षांत शहरी भागात उद्भवणाऱ्या पूरस्थितीसाठीही ओळखला जाऊ लागला आहे. यासाठी कारणीभूत ठरली आहे ती नियोजन धाब्यावर बसवून केलेली विकासकामे. विदर्भातून जाणाऱ्या नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर पाण्याच्या निचऱ्याचे नियोजन नसल्याने ते शेतात शिरते, सिमेंट रस्त्यालगत नाला नसल्याने नागपुरात दरवर्षी हजारो घरात पाणी जाते, चंद्रपूर जिल्ह्यात कोळसा खाणींतून निघालेल्या मातीच्या ढिगाऱ्यांना अडून नदीचे पाणी गावांना पुराचा फटका बसतो. कमी-अधिक प्रमाणात अशी स्थिती विदर्भातील छोट्या शहरांमध्येही आहे. उपराजधानी दरवर्षी पाण्यात गरज नसताना बांधले जात असलेले सिमेंट रस्ते, नदी असूनही नाल्याचे स्वरूप आलेल्या नागनदीच्या पात्रात सर्व नियम धाब्यावर बसवून करण्यात आलेली बांधकामे यामुळे नागपूर परिसरातील शेकडो घरांमध्ये शिरते. याच भागात नदीवर स्लॅब टाकून ती जागा वाहनतळासाठी वापरली गेली आहे. नागपूच्या अंबाझरी तलावाला खेटून सौंदर्यीकरणाच्या नावाखाली पुतळा उभारण्यात आला आहे. आजूबाजूला बांधकाम करण्यात आले आहे. तलाव ओव्हरफ्लो झाला की तेथील पाणी या बांधकामाला अडून रस्त्यावर येते. हे सर्व बेकायदेशीर आहे हे सरकारी यंत्रणा मान्य करते, पण ती पुतळा हटवायला तयार नाही. असाच प्रकार फुटाळा तलावाच्या बाबतीतही घडला आहे. तलावाच्या मध्यभागीच रंगीत कारंजी उभारण्यासाठी बांधकाम करण्यात आले आहे. शहरात मागील दहा वर्षांत अनेक उड्डाण पुलाचे काम हाती घेण्यात आले. या कामांमुळे रस्त्यालगतचे नाले बुजले. त्यामुळे पावसाचे पाणीच जायला मार्ग उरला नाही. नागपुरात महापालिका, नागपूर सुधार प्रन्यास, राष्ट्रीय होण्यासाठी व्यवस्थाच नाही. ते शेतात शिरते व शेताला तलावा-चे स्वरूप येते. या महामार्गासाठी अनेक नाले बुजवण्यात आले, काहींचा मार्ग बदलण्यात आला. पावसाळा आला की पुन्हा या ठिकाणी पूरस्थिती निर्माण होते. खुद्द या भागातील आमदाराने प्रयत्न करून ही समस्या दूर झाली नाही. यंदाही पुन्हा हाच प्रकार घडला. असाच प्रकार अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे तालुक्यातील आष्टा, चिंचोली, विटाळा, कळाशी, निंभोरा राज, निंभोरा बोडखा, झाडा, झाडगाव, तळणी, आसेगाव, सावला, नारगावंडी, मलातपूर, वाढोणा, शेंदुर्जना खुर्द, शमशेरपूर, गणेशपूर गावातील शेतकऱ्यांसाठी हा महामार्ग वरील कारणामुळेच डोकेदुखी ठरला आहे. या भागात कंत्राटदाराने रस्त्यावरील पाण्याचा निचरा करण्यासाठी केलेल्या उपाययोजना कोलमडल्या. पावसाला सुरुवात होताच शेतकऱ्यांची



शहराला दरवर्षी पुराचा फटका बसतो. यंदा २० जुलैला झालेल्या तीन तासांच्या पावसात नागपूरच्या सर्व प्रमुख वस्त्यांमधील सुमारे दहा हजार घरांमध्ये पाणी शिरल्याचे खुद्द महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी जाहीर केले. त्यापूर्वी २३ सप्टेंबर २०२३ मध्ये झालेल्या पावसात तर तब्बल एक हजार कोटींची हानी झाली होती आणि ४० हजारांवर घरात पाणी शिरले होते. पावसाळ्यात पाऊस येणारच मग दरवर्षी परिस्थिती का यावी, याचे उत्तर विकासकामांच्या अतिरेकात सापडते. प्रत्येक रस्ता सिमेंटचाच करण्याचा आग्रह, तो करताना त्यावर साचलेल्या पाण्याच्या निचऱ्याची न केलेली व्यवस्था, त्यामुळे तासभर पाऊस झाला तरी रस्त्यावर पाणी साचते आणि पाण्याचा प्रवाह अधिक असेल तर लोकांच्या घरात दोन-दोन फूट पाणी जाते. अंबाझरी लेआऊट परिसरात नागपूर सुधार प्रन्यास या सरकारी यंत्रणेनेच नदी व्यापाऱ्याला भाडेपट्ट्यावर दिली व त्याने थेट नदीवरच अतिक्रमण करून तिचे पात्र अवरुद्ध केले. परिणामी नदीला पूर आला की मग मिळेल त्या जागेतून मार्ग काढत पाणी महामार्ग प्राधिकरण, महामेट्रो यांची एकाच वेळी बांधकामे सुरू आ-हेत. यांच्यात कुठलाही समन्वय नाही, बांधकाम साहित्य घेऊन येणाऱ्या जड वाहनांने रस्त्यांची चाळणी झाली, आता रस्ता शोधत नागपूरकरांना जावे लागते, इतकी वाईट स्थिती निर्माण झाली आहे. विकासाला विरोध असण्याचे काहीच कारण नाही, पण तो जिवावर उठायला नको. नागपूरमध्ये नेमके हेच झाल्याने संताप वाढला आहे. 'समृद्धी'चे पाणी शेतात हीच परिस्थिती समृद्धी महामार्गाची झाली आहे. विदर्भाच्या समृद्धीचा हा मार्ग ठरेल, असे स्वप्न विदर्भातून ज्या भागातून हा रस्ता जातो तेथील शेतकऱ्यांना दाखवून त्यांच्या शेतजमिनी घेण्यात आल्या. आता याच महामार्गावरील पाणी त्यांच्या उर्वरित शेतात साचू लागले आहे. नागपूरमधून सुरू झालेला हा मार्ग वर्धा, अमरावती, बुलढाणा जिल्ह्यांतून पुढे जातो. वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील गोंदापूर, कान्हापूर, मोहनापूर, इटाळा, महाबळा, आमगाव, खडकी, सेलडोह, महाकाळ, बाबुळगाव या गावातील शेतात समृद्धी महामार्गाचे पाणी साचते. कारण रस्त्यावरील पाण्याचा निचरा चिंता वाढते. रस्त्यावरील पाण्यामुळे फक्त शेतात तळेच साचत नाही तर प्रवाहासोबत जमीन खरडून जाते. पेरणी वाया जाते. नियोजनाच्या अभावातूनही ही स्थिती ओढवल्याचे स्पष्ट होते. कोळसा खाणींमुळे पूर चंद्रपूर जिल्ह्यात वेस्टर्न कोलफिल्ड लि.च्या सुमारे ४० कोळसा खाणी आहेत. त्यापैकी काही नदीजवळ आहेत. खाणीतून काढलेली माती नजीकच्या खुल्या जागेवर टाकली जाते. त्याचे आता ठिकठिकाणी डोंगर उभे झाले आहेत. नदीला पूर आला की पाणी या ढिगाऱ्यांना अडून गावात शिरते. राजुरा तालुक्यातील राजुरा शहर, सास्ती, पवनी, गोवरी, चिंचोली, कोलगाव, वरोरा तालुक्यातील माजरी व अन्य गावांत ही समस्या आहे. याच कारणामुळे वर्धा नदीचे पाणी गावांमध्ये शिरते. कोळशाचे उत्खनन करता यावे म्हणून इरई नदीचा प्रवाह वळवण्यात आला आहे. या भागातील पूरसमस्येचे हेच प्रमुख कारण असल्याचे गावकरी सांगतात.

# वडापाववर जगणारे जीव!!

स्वारगेट पंढरपूर गाडीत अशा मोठ्या बॅगामध्ये आपला संसार घेऊन आलेले चार पाच कडके तरुण चढले. दरवेळी या मार्गाने निघाले की ४/५ लोक दिसतात असे. बहुतांश तरुण मुलं,पुरुष यूपी बिहारमधून आलेली असतात. त्यांचा कुणीतरी एखादा कॉन्ट्रॅक्टर असतो किंवा त्यांच्या आधी कुणीतरी त्यांच्या नात्यातील,गावातील मुंबई,पुणे किंवा इकडे आलेलं असतं.पूर्वी ही मंडळी मुंबई पुण्यातच दिसायची.आता ती ग्रामीण महाराष्ट्रात दिसू लागली आहेत.बहुसंख्य असंघटित बांधकाम कामगार,रंगकाम किंवा घरकाम व इतर तत्सम कामे करतात.यात मध्यप्रदेश,छत्तीसगढ,झारखंड कडचीपण मुलं असतात.यातले सर्वजण शहरात झोपडपट्टीत,अत्यंत कमी सुविधा असणाऱ्या, अस्वच्छ,अमानवीय जागेत राहतात. आयुष्यभर घाण वास मारणारे पब्लिक टॉयलेट वापरतात.गटाराच्यावर राहतात,यांची मुले गटारावर बसून टॉयलेट करतात.कुटुंब सोबत नसणारे एका एका खोलीत दाटीवाटीने झोपतात. लैंगिक दमन करवून घेतात पडेल ती कामे करतात. १००/५० रुपयांना मिळणारे शर्ट,पँट आनंदाने (?) घालतात. काहीजण एखाद्या प्लांटच्या आसपास राहतात.काम आणि मोबाईलवर आयुष्य सुरू असतं.व्हिडिओ कॉलवर घरातल्यांशी रोज बोलतात,नंतर एकट्याने रडतात. हाताने बनवून खातात.जास्ती वेळा दाळ भात,कधीतरी कालवण असतं.अतिशय कमी पोषणमुल्ये असलेलं खाऊन,प्रचंड अंग मेहनतीचं काम केल्यानं सतत आजारी असतात आणि प्रौढ होण्या आधीच ही तरुण मुलं म्हातारी होतात. बाहेर कामाला जाणारे नाष्टा,जेवणा वेळीही वडापावच खातात,खाऊ शकतात.मुंबईत तर असे वडापाव खाऊन जगणारे अनेक जीव आहेत. जिभेला चव म्हणून वडापाव, समोसा खाणं आणि पोटाची आग शमविण्यासाठी खाणं वेगळंच की. रस्त्यावर मिळणाऱ्या राईस प्लेटची किंमत विचारून झाल्यावर अन्नाला पाहून भुकेनं तोंडात आलेली लाळ गिळून पुन्हा वडापाव पाण्याच्या घोटाबरोबर खाऊन घेणारे अनेक जण असतात यात. बऱ्याचदा १२ तासाचे काम.सेठ (कॉन्ट्रॅक्टर) कडून मिळणारी, दिलेली अपमानास्पद वागणूक,घरच्या समस्या,सोबतीला असणारे व्यसनी लोक यांच्यामुळे बिडी,तंबाखू गुटखा,दारू हे जवळचे सोबती वाटू लागतात.

कुणाला जर वाटत असेल की क्रिकेट खेळणं हे देशप्रेम आहे आणि शासनाने त्यांना करोडो रुपये देण्यात काहीही वावगं नाही किंवा अंबानीकडं पैसे आहेत म्हणून तो पैसे खर्च करतो,त्यात काही गैर नाही त्यांनी एकदा या वडापाववर जगणाऱ्या जीवांसोबत बोलावं.कधीतरी रोजच्या जगण्यात बदल म्हणून झोपडपट्टीत वेळ घालवावा,मग लक्षात येईल आर्थिक विषमता आणि देशातील संपत्तीचे असमान वितरण म्हणजे काय ते! झोपडपट्ट्या तोडल्या पाहिजेत, हे लोक बेकायदेशीर राहतात, असं म्हणून झोपडपट्ट्यातून नाकाला रुमाल बांधून जाणाऱ्या, रोज शॉवरशिवाय आंघोळ न करणाऱ्या आणि संडासात टॉयलेट पेपरशिवाय न जाणाऱ्या पांढरपेश्या लोकांनी एकदा झोपडपट्टीत जाऊन यांना अशा अमानवीय जागेत




का राहावे वाटते? असा प्रश्न मनाला विचारून एक दिवस राहावे. मग उत्तर मिळेल की तिथे राहण्याशिवाय पर्याय नसतो म्हणून तिथे राहावे लागते. मॉलमध्ये महिन्याला हजारोंच्या बिस्कीट आणि चटकदार पदार्थांची खरेदी करणाऱ्यानी रोज बारा तास उभ्याने अंग मेहनतीचे काम करून वडापाववर दिवस काढून दाखवावा. मऊशार गादीवर उबदार पांघरून घेऊन एसीशिवाय झोप न येणाऱ्यानी दहा बाय दहाच्या खोलीत आळीपाळीने झोपून बघावं.मग कळेल महाकाय बांधलेली मंदिरे लोकांची गरज नसून रोजगार आहे. मग लक्षात येईल शासनाकडून क्रिकेटर्सला दिल्या जाणाऱ्या २५ कोटीत किती जीव जेऊ शकले असते. आणि जस्टिन बिबरला दिले जाणारे ८२ कोटी कुणाच्या पोटावर पाय देऊन कमवलेले आणि कुणाच्या हिश्श्याचे आहेत! काही लोक आयुष्यभर काम करूनही पोट भरून खाऊ शकत नाहीत आणि काही लोक करोडो रुपये लग्नावर खर्च करतात. किती जीवघेणी तफावत आहे ही! देशात जन्मणाऱ्या प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगता यावं असं आयुष्य देणं, सुविधा, रोजगार देणं ही पूर्णतः शासनाची जबाबदारी आहे. ताक: यूपी बिहारमधून लोक महाराष्ट्रात येतात ही त्यांची चॉईस नाही,मजबूरी आहे. कुणाला असं स्वतःचं गाव,भावनिक मूळ,कुटुंब,प्रेमाची माणसं सोडून परक्या राज्यात, वेगळी भाषा,खानपान असणाऱ्या छोट्याशा गावात एखाद्या शेड किंवा गोडाऊनमध्ये जगायला आवडेल? असे जीव रोज देशातल्या अनेक राज्यात जातात.हे कसे जगले काय आणि कधी मेले कुणाच्याही लक्षात येत नाही. असं किडूकमिडूक,जीव जंतूसारखं दुर्लक्षित जगणं ही चॉईस कशी? सतत परप्रांतीय म्हणून केली जाणारी अवहेलना कुणाला हवी असणार?. त्यांच्या गरिबीसाठी त्यांना जबाबदार न धरता त्यांचे राज्य शासन आणि केंद्र शासनाला खडे बोल सुनावले पाहिजेत.(त्यांच्या स्वतःच्या राज्यातच रोजगार निर्मिती न करणाऱ्या शासनाला उलथवून लावण्याची ताकद यांच्यात येवो!) ऊ लक्ष्मी यादव यांचा हा लेख बांधकाम कामगार ग्रुपवर मिळाला.प्रत्येक शहराचा विकास दिसतो. पण विकास करणारे माणसं दिसत नाही.अशा असंघटित बांधकाम नाका कामगारांसाठी १९८२ पासून मी काम करीत आलो. त्यासाठी कष्ट,त्याग करून जिद्द ठेऊन आणि बुद्धीचा वापर करून असंघटीतांना संघटित करून न्याय हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी संघर्ष करीत आलो आहे.

संकलन :- सागर रामभाऊ तायडे,भांडुप,मुंबई.

# स्टेनलेस स्टील, नॉन-स्टिकच्या तुलनेत नवा कूकवेअर आरोग्यासाठी फायदेशीर; जाणून घ्या तज्ज्ञांचे मत



हल्ली बाजारात स्टेनलेस स्टीलपासून कास्ट आयर्न आणि नॉन–स्टिकपर्यंत विविध कूकवेअरचे पर्याय उपलब्ध झाले आहेत. परंतु, आता यामध्ये आणखी एका नव्या पर्यायाचीदेखील भर पडली आहे. हा पर्याय त्या लोकांसाठी डिझाइन करण्यात आला आहे, जो निरोगी आणि सुदृढ आयुष्य जगण्याला प्राधान्य देतो. ट्रिपली कूकवेअरमध्ये तीन थर असल्याचा दावा करण्यात आला आहे; जे अन्नाचे पौष्टिक मूल्य अबाधित ठेवण्यास मदत करतात. कोटिंग्ज आणि रसायनमुक्त असल्यामुळे या कूकवेअरला त्याच्या काही समकक्षांपेक्षा डिशवॉशर अनुकूल असल्याचेदेखील मानले जाते. खरे तर, त्याची लोकप्रियता इतकी वाढली आहे की, अनेक शेफ आणि दिग्गज लोक त्याची शिफारस करीत आहेत. म्हणून आपण सर्वांनी याचा वापर आपल्या दैनंदिन आयुष्यात करावा का? हे जाणून घेण्यासाठी आम्ही तज्ज्ञांचा सल्ला घेण्याचे ठरवले. डॉ. भावना पी, मुख्य आहारतज्ज्ञ, ग्लेनेगल्स हॉस्पिटल, हैदराबाद यांनी इंडियन एक्सप्रेस डॉट कॉमला सांगितले की, ट्रिपली डायट कूकवेअर हे फूड–ग्रेड स्टेनलेस स्टीलचे दोन थर (बाह्य व आतील) आणि ल्युमिनियमचा एक थर (मध्यभागी) अशा तीन थरांनी बनवण्यात आलेला आहे. त्यांनी सांगितले, याचे स्टेनलेस स्टीलचे थर अन्न आणि कूकवेअरमधील रासायनिक प्रतिक्रियांना प्रतिबंधित करतात आणि अन्नाची पौष्टिकता अबाधित ठेवतात.

डॉ. भावना यांनी सांगितले, हे कूकवेअर उष्णता समान रीतीने वितरित करण्यास मदत करते. त्यामुळे जळण्याची आणि असमान अन्न शिजविण्याची जोखीम कमी होते; ज्यामुळे पोषक तत्त्वांचा नाश होतो. या गुणवत्तेमुळे अन्नामधील अतिरिक्त तेलाची गरजदेखील कमी होते, त्यामुळे संतुलित आहार राखण्यास मदत होते. याव्यतिरिक्त ट्रिपली कूकवेअर टिकाऊ असते आणि बऱ्याचदा हानिकारक कोटिंग्जपासून मुक्त असते; जे कालांतराने खराब होऊ शकते. पुढे त्यांना सांगितले, तसेच हे उष्णता टिकवून ठेवण्याच्या गुणधर्मामुळे आरोग्यासाठी चांगले मानले जाते. काय लक्षात घ्यावं? डॉ. भावना यांनी सांगितले की, हे कूकवेअर जास्त गरम करणे टाळावे. त्यामुळे स्टेनलेस स्टीलमधून निकेल आणि क्रोमियम या मिश्रधातूची कमी प्रमाणात गळती होऊ शकते. पण, ट्रिपल डाएट कुकवेअर सिंगल–लेयर स्टेनलेस स्टील किंवा नॉन–स्टिक पॅनच्या तुलनेत अनेकदा महाग असते.

# उपवासात स्वयंपाकासाठी कोणते तेल वापरावे? तज्ज्ञ काय सांगतात, जाणून घ्या



आषाढ महिन्यात सण–वारांना सुरुवात होते आणि मग ओघानेच उपवासही सुरू होतात. आषाढी एकादशीपासून सुरू होणारे उपवास श्रावण महिना, गौरी–गणपती, नवरात्र असे करीत पुढील काही महिने चालतात. या काळात पावसाळा असल्याने जठराग्नी मंद झालेला असतो. त्यामुळे शरीराला आराम देण्यासाठी या उपवासांचे नियोजन असते, असे म्हटले जाते. श्रावणात अनेक जण सोमवार पाळतात आणि उपवास करतात. उपवासाचे शरीराला फायदे होतात, असे म्हटले जाते. उपवासाचे पदार्थ बनविण्यासाठी तुम्ही कोणते तेल वापरता ते खूप महत्त्वाचे आहे. उपवासात शरीरात अनेक बदल होत असल्यामुळे यावेळी पदार्थ सर्व प्रकारच्या तेलात शिजवून खाऊ शकत नाही. जाणून घ्या, यावेळी कोणते कुकिंग ऑइल शरीरासाठी चांगले असते. व्रतादरम्यान स्वयंपाकासाठी कोणते तेल निवडावे याविषयी सल्लागार व आहारतज्ज्ञ कनिक्का मल्होत्रा यांनी या विषयावर दी इंडियन एक्स्प्रेसला माहिती दिली आहे. त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ.

आहारतज्ज्ञ कनिक्का मल्होत्रा सांगतात, उपवासादरम्यान स्वयंपाकासाठी तेल निवडताना शुद्धता आणि मूळ याला प्राधान्य द्या. सुरक्षित स्वयंपाकासाठी, विशेषत: उच्च तापमान पद्धतींसाठी तेलाचा विचार करा. सामान्यतः मोनो अनसॅच्युरेटेड व पॉलीअनसॅच्युरेटेड फॅट्स यांनी समृद्ध तेल हे आरोग्यदायी पर्याय आहेत. चव आणि पौष्टिक या बाबी प्राधान्यानं लक्षात घेऊन, आधारित शुद्ध आणि अपरिष्कृत तेल संतुलित करा. सामान्य पर्यायांमध्ये शेंगदाणा तेल, तूप व मोहरीचे तेल यांचा समावेश होतो; परंतु त्यांची उपयुक्तता विशिष्ट व्रत मार्गदर्शक तत्त्वांवर अवलंबून असते. तेल नेहमी जपून वापरा आणि आहाराच्या आवश्यकतांचे पालन करण्यासाठी लेबले तपासा. मल्होत्रा यांच्या मते, व्रतादरम्यान तेलाची निवड अनेकदा सांस्कृतिक, धार्मिक व प्रादेशिक घटकांवर अवलंबून असते. शेंगदाणा तेलाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. अन्नाची चव न वाढविता, अत्यावश्यक फॅटी सिडस् प्रदान करणारा हा एक संतुलित पर्याय मानला जातो.

हिंदू धर्मात गाईला मातृत्व आणि पोषणाचे प्रतीक म्हणून पवित्र प्राणी मानले जाते. गाईच्या दुधापासून तूप बनवले जाते म्हणून त्याकडे पवित्र पदार्थ म्हणून पाहिलं जातं. तूप हे आवश्यक फॅटी सिडस् आणि चरबी विरघळणाऱ्या जीवनसत्त्वांनी समृद्ध आहे. जे पौष्टिक अन्न म्हणून समजण्यास योगदान देते. तथापि, त्याची उच्च संतृप्त चरबी सामग्री काहींसाठी चिंतेची बाब असू शकते. कोणते तेल टाळावे? परिष्कृत तेल : या प्रकारातील तेलावर खूप प्रक्रिया केलेली असते आणि त्यात अनेकदा डिटिव्ह्ज असतात; जी व्रताच्या शुद्धतेशी जुळणारी नसतात. भाजीपाला तेल : हे तेल अनेक प्रकारच्या बियांपासून बनविले जाते. या तेलांवर बऱ्याचदा जोरदार प्रक्रिया केली जाते आणि त्यात अस्वास्थ्यकर ट्रान्स फॅट्स असतात, ते सामान्यतः शुद्ध किंवा सात्त्विक मानले जात नाही.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू प्रो. डॉ. मनोहर चासकर यांचा सत्कार






लातूर :– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू प्रो. डॉ. मनोहर चासकर यांचा श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील (टाकळीकर) यांच्या हस्ते कुलगुरू दालनामध्ये यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सहसचिव सुनीलजी मिटकरी, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडीगावे, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, केंद्र समन्वयक डॉ. विजयकुमार सोनी, डॉ. बाळासाहेब गोडबोले, डॉ. सिद्राम डोंगरगे, डॉ. भास्कर रेड्डी आणि डॉ. दीपक चाटे यांची उपस्थित होती. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाची स्थापना सन १९७० रोजी झाली असून आज महात्मा बसवेश्वर महाविद्यालयामध्ये कनिष्ठ महाविद्यालयातर्गत कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्यावसायिक अभ्यासक्रम, वरिष्ठ महाविद्यालयातर्गत बी.ए., बी.कॉम., बीएस्सी., बी.एस.डब्ल्यू. आणि बी.सी.ए., पदव्युत्तर विभागांतर्गत समाजशास्त्र, इतिहास, भूगोल, गणित, तत्त्वज्ञान आणि राज्यशास्त्र आणि संशोधन केंद्राद्वारे भूगोल, समाजशास्त्र आणि तत्वज्ञान या विषयांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण, प्रशिक्षण आणि संशोधनाची सुविधा सुद्धा उपलब्ध आहे. तसेच महाविद्यालयामध्ये सर्व सुखसोईनी युक्त कुस्ती प्रशिक्षण केंद्र सुद्धा आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाला बहिस्थ शिक्षण अभ्यास केंद्राला मान्यता मिळाली आहे. या केंद्रांतर्गत एम.ए.मध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी आणि अर्थशास्त्र या चार आणि वाणिज्य असे एकूण पाच आणि पूर्वीचे सहा असे एकूण अकरा विविध विषयामध्ये पदव्युत्तर शिक्षणाची सोय महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात उपलब्ध झाली आहे. त्याबद्दल कुलगुरू प्रो. डॉ. मनोहर चासकर यांच्या सह बहिस्थ शिक्षण अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. विनायक जाधव आणि कार्यालय प्रमुख भुसारे यांचाही यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच बहिस्थ शिक्षण अभ्यास केंद्राला मान्यता मिळाल्याबद्दल श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील (तपसेचिंचोलीकर), कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, संचालक राजेश्वर बुके, संचालक बस्वराज (राजू) येरटे, संचालक काशिनाथ साखरे, संचालिका ललिता पांढरे, संचालक राजेश्वर पाटील, संचालक बाबुराव तरगुडे, संचालक प्रभूप्पा पटणे, संचालक गुरुलिंग धाराशिवे आणि संचालक महेश हालगे यांनीही अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी मा. कुलगुरू आणि संचालक यांनी महात्मा बसवेश्वर महाविद्यालया अंतर्गत नवीन मान्यता मिळालेल्या बहिस्थ शिक्षण अभ्यास केंद्राबद्दल अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आणि संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी मा. कुलगुरू, संचालक आणि कार्यालयातील सर्व कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# कारगिल विजय दिनानिमित्त शहिदांच्या बलिदानाचे स्मरण

लातूर :– कारगिल विजय दिनानिमित्त जिल्हा क्रीडा संकुल येथील शहीद युध्द स्मारक येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामार्फत आयोजित या कार्यक्रमात शहीद सैनिकांच्या बलिदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून श्रध्दाजंली वाहण्यात आली. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.), सैन्य सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी, भारतीय माजी सैनिक संघटनेचे यांचे पदाधिकारी, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे सर्व कर्मचारी, माजी सैनिक, माजी सैनिक विधवा पत्नी, वीरमाता व वीरपिता यावेळी उपस्थित होतेशहीद जवानांच्या वीरपत्नी, वीरपिता, वीरमाता यांचा शाल, पुष्पगुच्छ देवून यावेळी सन्मान करण्यात आला.

# पावसाळ्यात काय खाल-प्याल? काय टाळाल?



पावसाळ्याचा बेत म्हटलं की, गरमागरम वड– भजी असंच चित्र डोळ्यासमोर येतं. पण अनेकदा या भजी आणि वड्यांवर ताव मारलयानंतर पोटाच्या तक्रारी सुरू होतात. अशा वेळेस पावसाळ्यात काय खावं आणि काय टाळावं हे आधीच ठावूक असेल तर? पोट बिघडलंय पल्लवी पावसाळा सुरु झालाय आणि आता माझं सगळं डाएट बिघडणार आहे. एकतर पालेभाज्या बंद होणार आहेत आणि मला इतकी भूक लागते आहे गेले काही दिवस की, – रीमा सांगत होती . माझं दर पावसाळ्यात असंच होतं. सगळं जैसे थे वर येत कालपासून पोट बिघडलंय काय खाल्लं होतं? सगळं नॉर्मल डोसा, पोळी भाजी, पेर, दाणे संध्याकाळी सँडविच, एवढंच खाल्लय. चटणी खाल्लीय का ? हो, पुदिना आणि खोबऱ्याची चटणी – ती एकच बाहेरून खाल्लीये मला रीमाच्या पोटाच्या तक्रारींचे आणि खाण्याचे धागे हाती लागू लागले आणि दाणे– पुदिना रोस्टेड होते. (अलीकडे रोस्टेड आणि बेक्ड या नावाने एक मीठ आणि मसाल्याची जोरदार धूळफेक बाजारपेठेत सुरु आहे. त्यावर एक सविस्तर लेख लवकरच) मला नेमका संदर्भ लागला आणि मी रीमाला आहारविषयक बदल ठरवून दिले. तिचं आहार नियमन करता करता पावसाळा आणि त्यासोबत आहारात करता येण्याजोगे लहानसहान बदल याबद्दल मनात विचारचक्र सुरु झालं.

# लोकअदालत करिता मालमत्ता धारकांचा उस्फुर्त प्रतिसाद - २००० थकबाकीदार मालमत्ता धारकाना नोटिस - एक दिवसाकरिता १००% शास्ती माफी - एकाच दिवशी तब्बल ३.८ कोटी मालमत्ता कर वसुली - गाळे धारका कडून २३ लाख भाडे वसुली








लातूर/प्रतिनिधी : – लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता व मनपा गाळे धारकाकडून सन २०२४–२५ या आर्थिक वर्षात १००% कर वसुली करण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी कर संकलन विभागास दिले होते. त्यादृष्टीने उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर संकलन विभागा मार्फत वर्षाच्या सुरुवाती पासूनच टॅक्स वसुलीच्या दृष्टीने विविध उपक्रम/योजना राबविण्यात येत आहेत.. त्यानुसार मालमत्ता धारकाना सूट/सवलती देण्या सोबतच थकबाकीदार यांच्या कडे मोठ्या प्रमाणात असणारा थकीत कर वसुली करण्याचे दृष्टीने थकबाकी धारकावर कार्यवाही करण्यात येत आहे. थकबाकीदार मालमत्ता धारक व गाळे धारक यांच्याकडील थकीत कराची रक्कम पाहता ही प्रकरणे लोकअदालत मधे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यादृष्टीने तब्बल २००० थकबाकीदार मालमत्ता धारकाना लोक अदालत मधे उपस्थित राहण्याची नोटिस बजावण्यात आली होती. तेव्हा अधिकाधिक थकबाकीदार यांच्याकडून टॅक्स वसुली व्हावा या दृष्टीने एक दिवसाकरिता १००% शास्ती मधे सुट देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सदरील सुट ला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून एकाच दिवसात मालमत्ता धारकाकडून तब्बल ३.८ कोटी चे कर संकलन झाले आहे. तसेच मालमत्ता विभाग मार्फत थकीत गाळे भाडे असणारे १५० गाळे धारकाना सुद्धा लोकअदालत ची नोटीस बजावण्यात आली होती व त्यांच्याकडून २३ लाख गाळे भाडे वसुली झाली. लोक अदालत मधे अधिकाधिक नागरीकाना सहभागी होता यावे या दृष्टीने कर अधीक्षक सतिष टेंकाळे, मालमत्ता व्यवस्थापक रवि कांबळे, विधी अधिकारी सूर्यवंशी, मनपा कायदे सल्लागार ॲड. येरटे, सर्व क्षेत्रीय अधिकारी,कर पर्यवेक्षक, व वसुली लिपिक यांनी अथक परिश्रम घेतले.

तसेच सध्या ऑनलाइन पधतीने टॅक्स भरल्यास लागू असणारी १०% सुट योजना फक्त ३१ जुलै पर्यंतच असल्याने व सदरील सुट ला पुढे मुदतवाढ देण्यात येणार नसल्याने, उर्वरित मालमत्ता धारकाणी त्वरित ऑनलाइन पधतीने टॅक्स भरून १०% सूट चा लाभ घ्यावा व सहकार्य करावे असे आव्हान कर संकलन व कर आकारणी विभागाचे उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांच्या वतीने करण्यात येते कर भरणा करण्यासाठी सिटीझन ॲप किंवा या वेबसाईटचा वापर करावा . किंवा आपल्या वसुली लिपिक, क्षेत्रीय कार्यालय, व मनपा मुख्यालय येथे आपल्याकडील देय कराचा भरणा करून वरील देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ घेण्यात यावा.

# अण्णाभाऊ साठे जयंती समितीच्या अध्यक्षपदी यु.डी. गायकवाड तर सचिवपदी रामराजे आत्राम यांची निवड

लातूर - येथील गुरू करिअर अकादमी मध्ये प्रा.सुभाष भिंगे यांच्या अध्यक्षतेखाली ' जी - २४ ' या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक संपन्न झा ली. या बैठकीमध्ये बहूजन नायक , साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती निमीत्त लातूर शहरात आणि जिल्ह्यातील ग्रामीण भागात संपूर्ण महिनाभर विविध सांस्कृतिक आणि वैचारिक कार्यक्रम घेण्याचे निश्चीत करण्यात आले. हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यावेळी ' जी- २४ ' अंतर्गत एक समिती गठीत करण्यात आली. ती पुढील प्रमाणे





अध्यक्ष - यु.डी. गायकवाड , सचिव - रामराजे आत्राम, कार्याध्यक्ष - बरकत काझी, कोषाध्यक्ष - इंजि. श्रीधर शेवाळे, उपाध्यक्ष - प्रा.अर्जुन जाधव, अॅड. राजकुमार गंडले, एम.के. शिंदे, इंजि.इकराम शेख, प्रा. युवराज वाघमारे, अॅड. विजयकुमार चिखलीकर, अॅड. संतोष मस्के, सहसचिव -जी.ए. गायकवाड, प्रा.डॉ. मारोती गायकवाड, श्रीहरी कांबळे, दशरथ मस्के, अॅड. किरण जाधव, प्रसिध्दी प्रमुख -डी. उमाकांत, महिला प्रतिनिधी - सुधाताई कांबळे ,संघटक - नरसिंग घोडके,अॅड. दिपक साठे, प्रा.बळीराम मोठेराव, शिरीष दिवेकर, नारायण कांबळे, इंजि. राहूल मोटे, श्रीकांत मुद्दे, सुभाष सूर्यवंशी, आणि सल्लागार म्हणून सर्वश्री प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, माधव बावगे, प्राचार्य डॉ.आर.डी. निटूरकर, अॅड. मंचकराव डोणे, प्रा.डॉ. अशोक नारनवरे, प्रा.डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे, प्रा.सुभाष भिंगे आणि अंगद नेटके आदींची एकमताने निवड करण्यात आली आहे.

या समितीचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# प्रा.सुखदेव होळीकर एलएलबी उत्तीर्ण

लातूर :- शिक्षणाचा घरात गंधही नाही,वडील शेतमजूर सालगडी,निरक्षर आई आणि तरीही शिक्षणाची प्रचंड आवड आणि जिद्दीच्या बळावर होळी,ता. लोहारा,जि.धाराशिव येथील प्रा.सुखदेव शिवाजी होळीकर यांनी मुंबई विद्यापीठातून दि.२५ जुलै २०२४ एलएलबी उत्तीर्ण होवून होळीतून पहिला वकील होण्याचा बहुमान मिळवला आहे.त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



सुखदेव होळीकर यांनी गावच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतून पहिली ते सातवी,येथीलच महात्मा गांधी विद्यालयातून आठवी ते दहावी,नाईचाकूर येथील शरदचंद्रजी पवार क.महाविद्यालयातून बारावी सायन्स,उमरगाच्या आदर्श महाविद्यालयातून बी.ए.शिक्षण घेतले. पुणे विद्यापीठातून एम.ए.इंग्रजी ची पदवी संपादन केली.जळकोट,जि.नांदेड येथील महात्मा फुले अध्यापक विद्यालयातून बी.एड.,तर येथूनच एम.एड.पदवी मिळवली. तर मुंबई विद्यापीठातून २५ जुलै २०२४ रोजी एलएलबीची परीक्षा ७४.२७ टक्के गुणांनी उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला आहे.

कष्टकरी,निरक्षर घरातील मुलाने कायद्याच्या पदवीपर्यंतचा शिक्षणाचा खडतर प्रवास पूर्ण करुन परिवारासह गावचे नाव रोषण केल्याबद्दल गावच्या सरपंच सरोजा बिराजदार,महात्मा गांधी तंटामुक्त ग्राम समितीचे अध्यक्ष राम जाधव,पोलीस पाटील अंकुश गायकवाड,दत्ता गायकवाड,संजय बिराजदार, युवराज कोकाटे, लक्ष्मण राठोड,बाबूराव राठोड, मारुती जाधव,केशव सरवदे,विठ्ठल जाधव,प्रदीप मोरे, संतोष राठोड,बालाजी गायकवाड,संजय कांबळे, मधुकर गायकवाड गावकर्यांनी ऍड.होळीकर यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# तुर्कीने दिली इस्त्रायलला हल्ल्याची धमकी

तेल अविव : मध्यपूर्वेतील परिस्थिती सातत्याने चिघळताना दिसत आहे. बहुतांश मुस्लीम देश इस्त्रायलला घेरण्याचा प्रयत्न करत आहेत. इराणच्या समर्थनाने हिजबुल्लाह इस्त्रायलवर हल्ले करत असतानाच आता तुर्कस्ताननेही इस्त्रायलला हल्ल्याची धमकी दिली आहे. खरे तर, इस्त्रायल आणि हिजबुल्लाह यांच्यातील तणाव वाढला आहे. यामुळे तुर्कीचे राष्ट्रपती रेसेप तय्यप एर्दोगन यांनी रविवारी इस्त्रायलवर लष्करी कारवाईची धमकी दिली. यानंतर आता, इस्त्रालयलनेही एर्दोगन यांच्या धमकिला इशारावजा प्रत्युत्तर दिले आहे. एर्दोगन यांचे हाल इराकचे माजी राष्ट्रपति सद्दाम हुसेन यांच्यासारखे होतील. ज्याला फाशी देण्यात आली होती असे इस्त्रायलने म्हटले आहे. इस्त्रायलचे परराष्ट्र मंत्री इस्त्रायल कॅट्झ यांनी एक्सवर एक पोस्ट करत म्हटले आहे. इस्त्रायलवर हल्ला करण्याची धमकी देऊन एर्दोगन सद्दाम हुसेन यांच्या पावलावर पाऊल टाकत आहेत. तेथे काय झाले होते आणि ते कसे संपले, हे त्यानी स्मरणात ठेवायला हवे. एवढेच नाही तर, त्यांनी आपल्या पोस्टसोबत सद्दाम हुसेन आणि एर्दोगन यांचा फोटोही शेअर केला आहे. महत्वाचे म्हणजे, तुर्की इस्त्रायलमध्ये घुसू शकते, ज्या पद्धतीने ते लिबिया आणि नागोर्नो-काराबाखमध्ये घुसले होते, अशी धमकी एर्दोगन यांनी दिल्यानंतर, काट्झ यांची प्रतिक्रिया आली आहे. इस्त्रायलला धमकी एर्दोगन हे इस्त्रायलच्या गाझातील सैन्य कारवाईचे कट्टर विरोधक राहिले आहेत. आपल्या संरक्षण उद्योगासंदर्भात बोलताना ते अचानक युद्धाच्या चर्चेकडे वळले. आपल्या पक्षाच्या बैठकीत एर्दोगन म्हणाले आपण अत्यंत मजबूत व्हायला हवे. जेणेकरून इस्त्रायल पॅलेस्टाइनसोबत हास्यास्पद गोष्टी करणार नाही.

# ओबीसी कोरेगाव खटावमान मधील विविध संघटनेतील कार्यकर्त्यांची तातडीची मीटिंग

सातारा / प्रतिनिधी :- कोरेगाव व खटाव मान तालुका ओबीसी संघटनेची मीटिंग मंगळवार दिनांक ३०जुलै २०२४ रोजी दुपारी दोन वाजता कोरेगाव रहिमतपूर रोड मॉर्डन हायस्कूल समोर नामदेव मंदिर कोरेगाव येथे आयोजित केली आहे. तरी कोरेगाव व खटाव मान तालुक्यातील ओबीसी बहुजन बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

दिनांक ११ ऑगस्ट २०२४ रविवार रोजी सांगली येथील तरुण भारत स्टेडियम वरती पश्चिम महाराष्ट्र ओबीसी सर्व संघटनांचा आजची सामाजिक राजकीय परिस्थिती पाहता वरिष्ठ नेत्यांनी केलेल्या आदेशानुसार महा मेळावा आयोजित केला आहे .या मेळाव्यात मराठ्यांना ओबीसी चे प्रमाणपत्र / बनावट कुणबी दाखले देण्याचे काम चालू आहे.त्या संदर्भात सविस्तर चर्चा केली जाणार आहे. कार्यक्रमास मा अन्न व पुरवठा मंत्री महाराष्ट्र राज्य छगन भुजबळ साहेब, आमदार पंकजाताई मुंडे, आमदार विजय वडेदिवार




असे सर्व पक्षातील ओबीसी आमदार व खासदार नगरसेवक पंचायत समिती सदस्य ग्रामपंचायत सदस्य सोसायटीचे सदस्य नगरसेवक यांना निमंत्रित केले आहे. तरी आपल्या खटाव मान कोरेगाव तालुक्यातून मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवण्याचा संदर्भात प्रसिद्धी माध्यम प्रचार यंत्रणा जनजागृती ओबीसी जोडू अभियान अंतर्गत राबवण्यासाठी मेळाव्याच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आयोजन नियोजन करण्यासाठी सदर मीटिंग केली आहे. तरी ओबीसी हितचिंतक, ओबीसीतील रिटायर कर्मचाऱ्यांनी, ओबीसी विद्यार्थी व विद्यार्थिनी या मिटींगला उपस्थित राहून आपले प्रश्न समजावून घेऊया. हा मेळावा माजी ओबीसी नेते आमदार प्रकाश अण्णा शेंडगे यांनी आयोजित केला आहे.तरी सर्व ओबीसी बांधवांनी शक्य होईल त्या ओबीसींना प्रत्येक गावात वाढ मध्ये वाडी वस्ती वरती हा मेसेज पोहोचवावा व आपणही मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे. अशी विनंती कोरेगाव तालुका अध्यक्ष उद्धव करणे व सातारा जिल्हाध्यक्ष भरत लोकरे यांनी युवक युवती पदवीधर उद्योजक सामाजिक कार्यकर्ते सर्व ओबीसी जातीचे / राजकीय पक्षांचे कार्यकर्ते लेखक कवी इलेक्ट्रिक मीडिया प्रिंट मीडिया सोशल मीडिया प्रतिनिधी पत्रकार सर्व ओबीसी बांधवांना जाहीर आव्हान केली आहे.

# सफाई कामगारांचा सन्मान सोहळा

लातूर: अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या वतीने सफाई कामगार व स्वच्छता कामगारांचा सत्कार सन्मान सोहळा दिनांक ३१ जुलै रोजी दुपारी १.३० वाजता भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात येथे आयोजित करण्यात आला आहे. कष्टकरी, कामगार, सफाई कामगारांचा ३१ जुलै हा सफाई कामगार बलिदान दिवस म्हणून देशातल्या अनेक जिल्ह्यात साजरा केला जातो. तो लातूर जिल्ह्यातही साजरा करण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य प्रा. डॉ. माधव गादेकर हे भूषविणार आहेत. लातूर मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे, लातूर पोलीस उपाधिक्षक गजानन भातलवंडे, सहाय्यक आयुक्त कामगार लातूर विभाग मंगेश झोले, राष्ट्रीय मजदूर संघाचे अध्यक्ष सुनील शिंदे, भारतीय भटके विमुक्त जाती जमाती संघटना अध्यक्ष प्राध्यापक सुधिर अनवले, लातूर जिल्हा सरकारी कामगार अधिकारी अविनाश देशमुख, अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटना महाराष्ट्र अध्यक्ष राजकुमार होळीकर या मान्यवरांच्या हस्ते आदर्श , गुणवंत स्वच्छता कामगारांचा सत्कार, सन्मान करण्यात येणार आहे.

या सत्कार सोहळ्याचे आयोजन केंद्रीय कार्यकारिणीचे सचिव शिवाजी भंडारे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य सुरेश काटे, लातूर शहराध्यक्ष अंकुश टगळगे, प्रमोद बानाटे, किशोर सगर,मंगल शिंदे,महिला आघाडी प्रमुख नूतन अंगरखे, अहिल्या इंगळे,मजिद बागवान, सुरेश काळे, महेंद्र कांबळे, युसुफ शेख, आदी मान्यवरांनी केले आहे.

# सम्यक कोकण कला संस्थेच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप

पालघर :- कलाक्षेत्रासोबतच सामाजिक बांधिलकी जोपासत कलेसोबतच सामाजिक कार्यात सहभागी राहणाऱ्या अग्रेसर असणाऱ्या व कलावंताचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सम्यक कोकण कला संस्थेच्या वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी संस्थेचे अध्यक्ष मंदार कवाडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जिल्हा परिषद शाळा जळवाई (केंद्र बोर्डी) ता. डहाणू, जिल्हा पालघर शाळेच्या मुख्याध्यापिका रेवतीताई मोरे यांच्या उपस्थितीत शाळेतील इयत्ता पहिली ते इयत्ता चौथीच्या सर्व शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक वस्तू, वह्या यांचे वाटप करण्याचा सामाजिक उपक्रम शनिवार दि. २७ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ठीक ११ वाजता मोठ्या उत्साहात संपन्न झाला.






मौजे जळवाई हा दुर्गम व आदिवासी बहुल विभाग असून तेथे मुख्यत्वे वारली आदिवासी राहतात, विध्यार्थ्यांचे आई-वडील पोटापाण्यासाठी भल्या पहाटेच घर सोडतात अश्या परिस्थितीत मुलांनी कधी आंघोळ केलेली असते तर कधी केलेली नसते अशा मुलांसाठी खोबरेल तेल, पावडर, फणी याची व्यवस्था केली आहे, मुख्याध्यापिका रेवतीताई मोरे या गेली ७ वर्षे सदर शाळेवर रुजू आहेत, रोज सकाळी साडेतीन तास व संध्याकाळी साडेतीन तास प्रवास करून सदर शिक्षादानाचे महत्कार्य करीत आहे यातच शिक्षिका म्हणून त्यांची आपल्या विद्यार्थ्यांशी असलेली बांधिलकी व शिक्षणकार्यावर असलेली आस्था दिसून येते. सदर कार्यक्रमाला अध्यक्ष मंदार कवाडे, कार्याध्यक्ष चिंतामण जाधव, उपाध्यक्ष मुकुंद तांबे, उपाध्यक्ष विनोद धोत्रे, उपाध्यक्ष मोहन थोरात, सरचिटणीस नरेश शिंदे, खजिनदार सुभाष सावंत, प्रसिध्दी प्रमुख चंद्रकांत तांबे, शाहीर चंद्रमणी घाडगे, गायक संतोष घाडगे, गायिका अनिता गायकवाड, गायक अनिल रिंगणेकर, गायक केशव निकम, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा पुष्पाताई दांडेकर, उपाध्यक्ष निलेश निमला, अंगणवाडी शिक्षिका मंगला चुंबळे मॅडम, सौ. शिला दांडेकर आणि इतर मान्यवर कार्यकर्ते पावसाची तमा न बाळगता हाती घेतलेले सामाजिक कार्य पूर्ण करण्यासाठी भरपावसात मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकुंद तांबे यांनी केले तर मोरे मॅडमनी प्रस्ताविक सादर केले, अध्यक्ष या नात्याने बोलताना मंदार कवाडे यांनी संस्थेचे कला व सामाजिक क्षेत्रातील ध्येय व उद्दिष्टे, गेल्या २५ वर्षातील कला व सामाजिक क्षेत्रातील कामगिरी, उपक्रम व पुढील धोरण यांचा आढावा घेतला, सदर वर्षी ही सालाबादप्रमाणे उपक्रमाची आखणी करून जिल्हा परिषद शाळेच्या मुक्याध्यापिका मॅडमना संपर्क साधून सदर उपक्रम राबविण्याचा ठराव सभागृहात सर्वांनुमते मंजूर करून त्या अनुषंगाने आम्ही आज याठिकाणी येऊन सदर उपक्रमास मूर्तरुप दिले असे नमूद केले, महाराष्ट्राचे प्रसिद्ध गायक संतोष घाडगे ह्यांनी शिक्षणाचे महत्व पटवून देणारे गाणे सादर केले, सोबतच चिंतामण जाधव व इतर कार्यकर्त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना अभ्यास, सर्वांगीण विकासासाठी प्रोत्साहित करीत मार्गदर्शन केले, तसेच जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका रेवतीताई मोरे यांनी आपले विचार करताना सम्यक कोकण कला संस्थेने येऊन गरीब व गरजू विद्यार्थ्यांना येऊन मदत व मार्गदर्शन करून त्यांच्यामध्ये जो सकारात्मक दृष्टिकोन निर्माण केला त्याबद्दल संस्थेचे व सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानून, सम्यक कोकण कला संस्थेसारख्या संस्थांनी ग्रामीण व दुर्गम विभागातील अशीच मदत करावी असे आवाहन केले. सरतेशेवटी उपाध्यक्ष मुकुंद तांबे यांनी उपस्थित शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक या सर्वांचे आभार मानले, चिटणीस नरेश शिंदे यांनी सदर कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी आजी माजी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जे योगदान दिले त्याबद्दल त्यांचे तसेच पावसाची तमा न बाळगता उपस्थित मुख्याध्यापिका रेवतीताई मोरे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थ यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर :- कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २९ जुलै, २०२४ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १२ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE